**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

**दिनांक ०४/०४/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील आंबेडकर नगर वार्ड क्र. ५ मनसर येथे दिनांक ०३/०४/२०२२ चे १४:३० वा. ते १५:०० वा. सुमारास फिर्यादी नामे– संतोष रामरावजी वघारे वय ५४ वर्षे रा. वार्ड नं. ५ मनसर हे सामुहिक विवाह सोहळा रामटेक येथे गेले असता अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने लोखंडी आलमारीचे कुलुप तोडुन लॉकर मधील बॅगमधुन नगदी अंदाजे ८०,०००/– रू. व दोन सोन्याची दागिने कि. ८०,०००/– रू. असा एकुण १,६०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री विवेक सोनवने मो.क्र. ९८२३०१७४२४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा माळी मोहल्ला नगरधन येथे दिनांक ०३/०४/२०२२ चे १४:३० वा. ते १५:०० वा. सुमारास फिर्यादी नामे– बाळचंद्र श्रावन नागरीकर, वय ४२ वर्षे, फुलमाळी, रा. नगरधन हे बाहेरगावी गेले असता अज्ञात आरोपीने त्यांचे घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपाटामध्ये असलेले सोन्या–चांदीचे दागिने असा एकुण ५३,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राजेंद्र अडामे मो.नं. ९६३७४००८७३ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा सावरमेंढा येथे दिनांक ०२/०४/२०२२ चे २१.१५ वा. ते दिनांक ०३/०४/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान आरोपी नामे– क्रिष्णा राजेंद्र केने वय २२ वर्षे रा. गुमथळा, (गुमथी) तह कामठी याने फिर्यादी नामे– गजानन सुखदेवजी केने वय ४७ वर्षे रा. वार्ड क्र. ३ सावरमेंढा ता. सावनेर यांच्या राहते घरी असलेल्या समोरील किराणा दुकानाचे शटरचे हुक चे उघडुन आत प्रवेश करून किराणा दुकानाचे गोडावून मधील लोखंडी आलमारीचे लॉकरमधील नगदी ६,०००/–रू. व आलमारीचे बाजुला ठेवलेला मोबाईल फोन कि १५,०००/–रू. असा एकुण कि २१,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौलदार कृष्णा जुनघरे मो.क्र. ९९२३०२३०५३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**